admn16-17


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

आय्एस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

MCAER
कृषि परिषद

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com
वेबसाईट : www.mcaer.org

दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.
फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र:मकृप/शिक्षण-१/२६१६/२९४३/२०१६ दिनांक ०९ नोव्हेंबर,२०१६

## प रि प त्र क

विषयः- सन २०१६-१७ या वर्षाच्या कृषी तंत्र पदविका, कृषी तंत्रज्ञान पदविका (Agriculture Polytechnic) व मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या वाढीव प्रवेश कार्यक्रमांतर्गत दिलेल्या प्रवेशासंदर्भात वाटप पत्रे प्राप्त करण्याबाबत.

संदर्भः- १. या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप / शिक्षण-१ / २६१६ / २०९९, दि.२०/८/२०१६

२. या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप / शिक्षण-१ / २६१६ / २५२९/२०१६, दि.३०/९/२०१६

सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षामधील चारही कृषी विद्यापीठांतर्गत कृषी तंत्र पदविका, कृषी तंत्रज्ञान पदविका (Agriculture Polytechnic) व मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाचा वाढीव प्रवेश प्रक्रियेचा कार्यक्रम संदर्भीय परिपत्रकान्वये संबंधित विद्यालयांच्यास्तरावर दि.२४/८/२०१६ ते ६/९/२०१६ या कालावधीत राबविण्यात आला. या प्रवेश कार्यक्रमांतर्गत कृषी तंत्र विद्यालय / निकेतनांनी विद्यार्थी गुणवत्ता यादी व विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे त्या त्या जिल्हयातील घटक / संलग्न विद्यालयांच्या प्राचार्यांकडून तपासून घेतली आणि त्यानुसार प्रवेश निश्चित करण्यात आलेले आहेत. अशा विद्यार्थ्यांना प्रवेश वाटप पत्रे उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिकोनातून या कार्यालयाच्या संदर्भ क्र.२ येथील परिपत्रकान्वये दि. ४ ते ६ ऑक्टोबर,२०१६ आणि दि. १० ते १३ ऑक्टोबर,२०१६ या कालवधीत संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती.

यानंतरही विद्यार्थ्यांची माहिती लॉग-इनद्वारे संकेतस्थळावर भरणे व प्रवेश वाटप पत्रे प्राप्त करून घेणेविषयक बाबी अपूर्ण असल्याचे विद्यालयांची पत्रे कृषी परिषद कार्यालयास प्राप्त झालेली आहेत.

यास्तव दि. १५ ते १९ नोव्हेंबर,२०१६ या कालावधीत संकेतस्थळावर लॉग-इनची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. या कालावधीत सर्व घटक व विना अनुदानित विद्यालयांनी उर्वरित विद्यार्थ्यांची माहिती संकेतस्थळावर भरावी. माहिती भरून झाल्यावर संबंधित घटक विद्यालयाला सूचित करावे. प्रवेश वाटप पत्रे फक्त घटक विद्यालयाच्या लॉग-

admn16-17

इनद्वारे प्राप्त करून देण्यात येतील. (डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली संदर्भात सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) यांच्या लॉग-इनमध्ये प्रवेश वाटप पत्रे उपलब्ध असतील.) ज्या प्रवेश वाटप पत्रावर संबंधित घटक विद्यालयाच्या प्राचार्यांची स्वाक्षरी आणि घटक विद्यालयाचा शिक्का नसेल, अशी प्रवेश वाटप पत्रे ग्राह्य धरली जाणार नाहीत.

सर्व घटक व कायमस्वरूपी विना अनुदानित विद्यालयांना या परिपत्रकाद्वारे असेही सूचित करण्यात येते की, **यापुढे वरीलप्रमाणे प्रवेश वाटप पत्रे प्राप्त करून घेण्यासाठी संकेतस्थळावर लॉग-इनची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार नाही**, याची नोंद घ्यावी.

**संचालक (शिक्षण) तथा**
**महासंचालक**

प्रति,

१. मा. कुलगुरु / कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी.

२. सहयोगी अधिष्ठाता (निकृशि), महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर / डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी.

यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. तसेच कृषी विद्यापीठाच्या सूचना फलकांवर परिपत्रकास प्रसिध्द द्यावी. याचबरोबर आपल्या कृषी विद्यापीठांतर्गत येणाऱ्या सर्व कृषी तंत्र विद्यालये / कृषी तंत्र निकेतने यांना कळवावे.

२/- तसेच गुणवत्ता यादीबाहेरील प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश अर्ज रक्कम (मागासवर्गीयांकरिता रू.२००/- आणि खुला वर्ग रू.४००/- प्रती विद्यार्थी) कृषी परिषद कार्यालयाकडे धनाकर्षाद्वारे जमा करावी. 'वित्तीय सल्लागार, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे' यांच्या नावे पुणे येथे देय असलेले राष्ट्रीयकृत बँकेचे धनाकर्ष असावे.

३. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., शॉप १ व २, राधाकांत को-ऑप हौसिंग सोसायटी, रामबाग कॉलनी, कृष्णा हॉस्पीटलसमोर, पौड रोड, पुणे ४११ ०३८

२/- त्यांना सूचित करण्यात येते की, कृषी तंत्र पदविका, कृषी तंत्रज्ञान पदविका (Agriculture Polytechnic) व मत्स्य अभियांत्रिकी पदविका पदवी अभ्यासक्रमाच्या वरील प्रवेश कार्यपध्दतीविषयी सर्व विद्यालयांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावे. तसेच सदर परिपत्रकात नमूद केल्यानुसार आवश्यक ती व्यवस्था संबंधितांच्या लॉग-इन मध्ये करून द्यावी आणि सर्व विद्यालयांना भ्रमणध्वनी संदेशाद्वारे परिपत्रकाबाबत सूचित करावे.

४. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, ई-१४, वर्ल्ड ऑफ मदर कॉम्प्लेक्स, जय गणेश व्हिजन, आकुर्डी, पुणे ४११ ०३५.

२/- त्यांना सूचित करण्यात येते की, कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर सदर परिपत्रक प्रसिध्द करण्यात यावे.